2024 VII 29 - 1100
२०२४ . ०७ . २९ - ११००

# N 435

Seat No.
बैठक क्र.

Time : 2 Hours
वेळ - २ तास

SOCIAL SCIENCES (73) GEOGRAPHY PAPER–II (M)
सामाजिक शास्त्रे (७३) भूगोल पेपर–२ (म)

(REVISED COURSE)

Pages - 8
पृष्ठे - ८

Total Marks : 40
एकूण गुण - ४०

---

सूचना :—

(1) *सर्व प्रश्न/कृती सोडविणे आवश्यक आहे.*

(2) *उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*

(3) *प्रश्न क्रमांक 4(अ) साठी पुरविण्यात आलेल्या ब्राझील नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.*

(4) *प्रश्न क्रमांक 6(अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.*

(5) *प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.*

(6) *प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.*

(7) *प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत.*

(8) *आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिस पेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.*

(9) *पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.*

# 2/N 435

**1. अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा : 4**

(1) एखाद्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन तेथील भौगोलिक घटकांची माहिती घेणे याला .......... असे म्हणतात.

(*i*) क्षेत्रभेट

(*ii*) आरोग्य पर्यटन

(*iii*) जनगणना

(*iv*) गृहभेट

(2) भारत हा देश .................... या पदार्थासाठी जगप्रसिद्ध आहे.

(*i*) तेलबिया

(*ii*) कॉफी

(*iii*) कोक

(*iv*) मसाला

(3) ब्राझील हा ...................... खंडातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश आहे.

(*i*) उत्तर अमेरिका

(*ii*) आशिया

(*iii*) दक्षिण अमेरिका

(*iv*) ऑस्ट्रेलिया

(4) भारतीय प्रमाणवेळ ही ग्रीनीच वेळेच्या ...................... पुढे आहे.

(*i*) 5 तास 15 मिनिटे

(*ii*) 5 तास 30 मिनिटे

(*iii*) 5 तास 45 मिनिटे

(*iv*) 6 तास 30 मिनिटे

**2. चुकीची जोडी ओळखा :** **4**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (1) | (*i*) | ॲमेझॉन जलप्रणाली | – | ब्राझीलच्या उत्तरेस |
| | (*ii*) | पुरागुआकु | – | ब्राझीलच्या पश्चिमेस |
| | (*iii*) | साओ फ्रान्सिस्को | – | ब्राझीलच्या पूर्वेला |
| | (*iv*) | पॅराग्वे-पॅराना जलप्रणाली | – | ब्राझीलच्या नैऋत्येला |
| (2) | (*i*) | भारताचे हवामान | – | मान्सून |
| | (*ii*) | ब्राझीलच्या उत्तरेला | – | विषुववृत्त |
| | (*iii*) | भारताच्या मध्यातून | – | मकरवृत्त |
| | (*iv*) | ब्राझीलच्या पूर्वेला | – | अटलांटिक महासागर |

(3) (*i*) लिंगगुणोत्तर कमी असलेला देश – भारत

(*ii*) साक्षरता जास्त असलेला देश – ब्राझील

(*iii*) तरुणांचे प्रमाण जास्त असलेला देश – ब्राझील

(*iv*) वृद्धांचे प्रमाण कमी असलेला देश – भारत

(4) (*i*) गेटवे ऑफ इंडिया – मुंबई

(*ii*) अजिंठा लेणी – औरंगाबाद

(*iii*) ताजमहाल – नई दिल्ली

(*iv*) कोलकाता – भारतातील प्रमुख बंदर

**3. टिपा लिहा (कोणतेही *दोन*) :** **4**

(1) भारत—स्थान व विस्तार

(2) अजस्र कडा

(3) हिंदी महासागराचे महत्त्व.

**4. (अ) ब्राझीलच्या नकाशा आराखड्यात माहिती भरा व सूची तयार करा (कोणतेही *चार*) : 4**

(1) रिओ ग्रांडे विमानतळ

(2) मॅनॉस बंदर


(3) पंपास गवताळ प्रदेश

(4) कटिंगा

(5) माराजॉ बेट

(6) उत्तर अटलांटिक महासागर.

(आ) खालील भारताच्या नकाशाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही *चार*) : **4**




**प्रश्न :**

(1) वरील नकाशा काय दर्शवितो ?

(2) 100 पेक्षा कमी लोकसंख्या घनतेचे कोणतेही **दोन** राज्य सांगा.

(3) मध्यप्रदेश राज्याची लोकसंख्येची घनता किती आहे ?

(4) दक्षिण भारतातील 500 पेक्षा जास्त घनता असलेले **दोन** राज्य कोणते ?

(5) मिझोराम राज्याची लोकसंख्येची घनता किती आहे ?

**5.** **भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही *दोन*) :** **6**

(1) भारताकडे एक प्रमुख जागतिक बाजारपेठ म्हणून पाहिले जाते.

(2) ब्राझीलमध्ये नेहमी हिमवर्षाव होत नाही.

(3) ईशान्य ब्राझीलमध्ये वस्त्या विरळ आहेत.

(4) भारतातील दूरसंचार उद्योग हे अतिवेगाने वाढणारे क्षेत्र बनले आहे.

**6.** **(अ)** **खालील सांख्यिकीय माहितीच्या आधारे स्तंभालेख तयार करा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **6**

**भारत — नागरीकरणाचा कल**

| **वर्ष** | **नागरीकरणाचा कल टक्केवारी** |
|---|---|
| 1961 | 18.0 |
| 1971 | 18.2 |
| 1981 | 23.3 |
| 1991 | 25.7 |
| 2001 | 27.8 |
| 2011 | 31.2 |

**प्रश्न :**


(1) कोणत्या वर्षात नागरीकरण सर्वाधिक होते ?

(2) 1981 ते 1991 या दशकात नागरीकरणात किती टक्क्याने वाढ झाली आहे ?

(3) कोणत्या वर्षी नागरीकरणाचा कल सर्वात कमी दिसतो ?

**किंवा**

**(आ) खालील आकृतीचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **6**




**प्रश्न :**

(1) प्राथमिक व्यवसायामध्ये गुंतलेल्या लोकसंख्येची टक्केवारी कोणत्या देशात जास्त आहे ?

(2) स्थूल अंतर्देशीय उत्पादनात कोणत्या देशात तृतीयक व्यवसायाचे योगदान अधिक आहे ?

(3) स्थूल अंतर्देशीय उत्पादनात द्‌वितीयक व्यवसायांचा हिस्सा कोणत्या देशात जास्त आहे ?

(4) भारतामध्ये द्‌वितीयक व्यवसायाचे योगदान किती आहे ?

(5) स्थूल अंतर्देशीय उत्पादनात तृतीयक व्यवसायातील ब्राझीलचे योगदान भारतापेक्षा किती टक्क्याने जास्त आहे ?

(6) भारतात कोणत्या व्यवसाय प्रकारात स्थूल अंतर्देशीय उत्पादन कमी परंतु लोकसंख्येची टक्केवारी जास्त आहे ?

**7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही *दोन*) :** **8**

(1) क्षेत्रभेट म्हणजे काय ? समुद्रकिनारी गेल्यावर कोणती काळजी घ्यावी ?

(2) हिमालय पर्वताची सविस्तर माहिती लिहा.

(3) ब्राझील व भारतामधील वनांचा ऱ्हास होण्याची कारणे कोणती ?